नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

औरंगाबाद कृषी हवामान सल्ला — शुक्रवार, दिनांक – १३ मे २०२१

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १४ ते १८ मे, २०२१)				
दिनांक	१४/०५	१५/०५	१६/०५	१७/०५	१८/०५
पाऊस (मिमी)	०.०	६.०	०.०	२.०	१५
कमाल तापमान (अं.से.)	४०.०	४२.०	४३.०	४२.०	३९.०
किमान तापमान (अं.से.)	२७.०	२८.०	२९.०	२५.०	२३.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	५३	५६	६७	६८	७८
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	३४	३६	४०	४३	४२
वा-याचा वेग (किमी / तास)	१२	११	१९	३३	३४
वा-याची दिशा	वायव्य	आग्नेय	आग्नेय	आग्नेय	आग्नेय

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानुसार दिनांक १५, १७ व १८ मे २०२१, रोजी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपात पावसाची शक्यता आहे. तसेच तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे

पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
उन्हाळी भुईमूग	काढणी / शेंगा वाढीची अवस्था	सध्याच्या काळात वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी भुईमूग काढणी सुरू आहे, वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे,काढणी केलेल्या उन्हाळी भुईमूग सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, शेंगा पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. उशिरा लागवड केलेल्या उन्हाळी भुईमूग पिकात रस शोषण करणाऱ्या (फुलकिडे, मावा, तुडतुडे) किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास इमिडाक्लोप्रीड १७.८ % ०२ मिली किंवा थायमिथोकझाम 12.6 % + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % ०३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड व वाऱ्याचा वेग कमी असताना फवारणी करावी.
हळद	काढणी अवस्था	सध्याच्या काळात हळदीची काढणी, हळद उकडणे, वाळवणे, पॉलिश करणे ही कामे सुरू आहेत. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्यामुळे, हळदीची उघडयावर साठवण करू नये.
सिताफळ	वाढीची अवस्था	सिताफळाच्या बागेत वाळलेल्या फांद्यांची छाटणी करावी तसेच बागेत विरळणी करावी. सिताफळ बागेत खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या जुन्या वाळलेल्या फांद्या कापून टाकाव्यात. मुख्य खोड लगत भुसा दिसून आल्यास तारेच्या आकड्याने आतील अळ्या काढून नष्ट कराव्यात व छिदामध्ये पेट्रोलमध्ये बुडविलेला बोळा किंवा क्लोरोपायरीफॉस द्रावणाचा (२ मिली प्रती लिटर पाणी) बोळा टाकावा व छिद्र शेणाने अथवा मातीने लिपून घ्यावे.
केळी	वाढीची अवस्था	केळी बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. केळी बागेत घडांना आधार द्यावा.
आंबा	काढणी अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, काढणी न केलेल्या व काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी लवकर करून घ्यावी. आंबा बागेत खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी

		प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या जुन्या वाळलेल्या फांद्या कापून टाकाव्यात. मुख्य खोड लगत भुसा दिसून आल्यास तारेच्या आकड्याने आतील अळ्या काढून नष्ट कराव्यात व छिद्रात पेट्रोलमध्ये बुडविलेला बोळा किंवा क्लोरोपायरीफॉस द्रावणाचा (२ मिली प्रती लिटर पाणी) बोळा टाकावा व छिद्र शेणाने अथवा मातीने लिपून घ्यावे.
द्राक्षे	फांदया फुटणे	द्राक्षे बागेत फुलकिडयांचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी 5 % निंबोळी अर्क किंवा स्पिनोसॅड 45% २.५ मिलि किंवा फिप्रोनिल 80% ०.६ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट 5% ४ मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड व वाऱ्याचा वेग कमी असताना फवारणी करावी. द्राक्ष बागेत अन्नद्रव्यांची कमतरता दिसून आल्यास 00:00:50 15 ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड व वाऱ्याचा वेग कमी असताना फवारणी करावी.
भाजीपाला	वाढीची/काढणी अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार आसलेल्या भाजीपाला पिकांची तसेच टरबूज, खरबूज इत्यादी पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. वांगी पिकावरील शेंडा व फळ पोखरणारी अळीच्या व्यवस्थापनासाठी 5% निंबोळी अर्काची किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल 18.5% एससी 4 मिली किंवा क्लोरपायरीफॉस 20% ईसी 20 मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट 5% एसजी 4 ग्रॅम किंवा फेनप्रोपॅथ्रीन 30% ईसी 5 मिली किंवा स्पिनोसॅड 45% एससी 3 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड व वाऱ्याचा वेग कमी असताना फवारणी करावी.
फुल शेती	वाढीची/काढणी अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या फुलपिकांची काढणी करून घ्यावी.
तुती रेशीम उद्योग	--	उन्हाळ्यात शक्यतो पट्टा पध्दत तुती लागवडीत शेंद्रिय पदार्थांचे किंवा पॉलिथीन (ब्लॅक) अच्छादन करावे. शेंद्रिय अच्छादनात गवत, काडीकचरा पिकांचे अवशेष झाडांची पाने, उसाचे पाचट इत्यादी किंवा साखर कारखान्यातील मळी (मोलेसीस) चा वापर करावा. आवकाळी पावसाने किंवा उन्हामुळे पाने वाळून त्याचा खत होतो. पट्टा पध्दत तुती लागवडीत एकास आड एक पट्टयात 2 X २.५X १.५ फुट आकाराचा चर खद्वून त्यात वरील शेंद्रिय पदार्थ भरावेत असे केल्याने जमिनीचा पोत सुधारणा होते व कार्बन : नायट्रोजन चे प्रमाणात सुधारणा होते. 200 गेज काळे पॉलिथीन अच्छादनास एकरी आठ हजार रूपये लागतात परंतू 1 ते 1.5 एकर तुती लागवड केलेल्या शेतकऱ्यांनी असे अच्छादन करणे म्हणजे 2 ते 3 वर्ष निंदनीच्या खर्चात बचत होऊ शकते.
सामुदायिक विज्ञान	-	इंग्रजी झेंडूंच्या फुलांची भुकटी पाण्यामध्ये उकळून त्यापासून रंग काढता येतो. हा रंग सुती, रेशमी आणि उनी धागे रंगविण्यासाठी अनुक्रमे 11%, 2% आणि 2% या प्रमाणात घेऊन वापरता येतो. इंग्रजी झेंडूच्या फुलांपासून रंग काढण्यासाठी व धागे रंगविण्यासाठी 30 मिनिटांचा वेळ प्रमाणित करण्यात आला आहे. सुती धागे रंगविण्यापूर्वी, 10% हरडयाच्या द्रावणात प्रक्रिया करणे गरजेचे आहे. तुरटी, क्रोम, कॉपर सल्फेट आणि फेरस सल्फेट या रंगबंधकाचा वापर करून फिका ते गडद केशरी, गडद विटकरी अशा विविध रंगछटा मिळतात. धुणे, घासणे, घाम आणि सूर्यप्रकाश या सर्व बाबीसाठी रंगाचा पक्केपणा अतिशय चांगला आहे.
पशुधन व्यवस्थापन		वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवा-याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. तसेच पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबु नये. उन्हाळा ऋतू असला तरीही अधून मधून पडत असलेल्या पावसामुळे किटकवर्गीय माशा जसे की डास, क्यूलीकॉईडस् ईत्यादीचे प्रमाण वाढले आहे व त्यांचा प्रादुर्भाव पशुधनास जाणवत आहे. म्हणून अशि शिफारस करण्यात येते की पशुधनावर 5 % निंबोळी अर्क अथवा द्रावण (15मिली निंबोळी तेल + 15 मिली कारंज तेल + 2 ग्रॅम अंगाचा साबण + 1 लिटर पाणी खूप वेळ ढवळणे) पशुधनावरती फवारावे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा जनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.